# School Activities / सहशालेय उपक्रम

## १) शिवजयंती




19 फेब्रुवारी - शिवजयंती निमित्त आपल्या आदर्श प्राथमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले जाते. विद्यार्थी या दिवशी शिवराय, मावळे अशा वैविध्यपूर्ण पारंपरिक वेशभूषेत विद्यालयात उपस्थित राहतात. महिला पालकांच्या हस्ते बाल शिवरायांचा पाळणा घेण्यात आला व शिवरायांच्या कार्याविषयी माहिती दिली जाते.

शिवरायांच्या शौर्याची गाथा सांगणारी विद्यार्थी मनोगते झाली. आगाशिवनगर परिसरात लेझीम, झांजपथक व शिवगीतावरील नृत्य, हर हर महादेव, जय भवानी जय शिवाजी, अशा जय घोषात भव्य अशी मिरवणूक काढण्यात येते. सदर मिरवणुकीत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने सहभागी होतात.

# २) गणेशोत्सव



आपल्या विद्यालयामध्ये गणपतीची सुबक मूर्ती आणून विधिवत प्राणप्रतिष्ठा केली जाते. दररोज सकाळी व संध्याकाळी आरतीचा कार्यक्रम केला जातो. विद्यार्थी, शिक्षकांच्या मदतीने चालू घडामोडी वर आधारित सुंदर असे देखावे तयार केले जातात. सदर गणेशोत्सवानिमित्त विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध फनी गेम्स आयोजित केल्या जातात. तसेच महिला पालकांसाठी हळदीकुंकू समारंभ, रांगोळी स्पर्धा, आरती पाठांतर स्पर्धा घेण्यात येतात. अशा विविध कार्यक्रमांनी हा गणेशोत्सव साजरा केला जातो.

## ३) दिंडी सोहळा



आषाढी एकादशी निमित्त विद्यालयात दिंडी सोहळ्याचे आयोजन केले जाते. या दिंडी सोहळ्यामध्ये बालवाडी ते सातवीचे विद्यार्थी सहभागी होतात. सदर दिंडी सोहळ्यात सर्व विद्यार्थी वेगवेगळ्या पारंपरिक वेशभूषेमध्ये सहभागी होतात. खांद्यावर भगवी पताका, गळ्यात तुळशीच्या माळा, आणि डोक्यावर तुळशीवृंदावन ठेवून विठ्ठल रखुमाई अशा प्रकारचा दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला. "ज्ञानोबा तुकाराम", "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल," अशा गजरात हा दिंडी सोहळा पार पडला.

ही आदर्शची दिंडी पाहणाऱ्यांच्या मनात भक्ती भाव निर्माण करत होती आणि उपस्थितांची वाहवा मिळवत होती.

# ३) राखी प्रदर्शन व रक्षाबंधन




भाऊ बहिणीच्या पवित्र नात्याला एक रेशीम धाग्यात बांधणारा सण म्हणजे रक्षाबंधन. या पवित्र प्रेमाची माहिती शाळेतील मुला मुलींना व्हावी म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या दिवशी राखी प्रदर्शन घेण्यात येते. सदर प्रदर्शनास पालक भेट देतात स्वतःचा अभिप्राय नोंदवतात. यावेळी सर्व मुलांना सर्व मुली राखी बांधतात व राखी बांधल्यानंतर मुले मुलींना भेटवस्तू देतात. अशा प्रकारे रक्षाबंधनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडतो.

# ५) राष्ट्रीय सण



15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिन व 26 जानेवारी प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. सदर दिवशी स्वातंत्र्यासाठी अनेक जणांनी केलेला त्याग, अनेकांनी केलेले बलिदान या त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा दिवस व आपल्या राष्ट्राविषयी राष्ट्रप्रेम जागृत करणारा दिवस म्हणून साजरा केला जातो.

इयत्ता पहिली ते इयत्ता सातवीचे सर्व विद्यार्थी गणवेशात हजर होते. त्यानंतर विद्यार्थी भाषणे, गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ, ध्वजारोहण, कवायत संचलन ,लेझीम,झांजपथक, मानवी मनोरे, सूर्यनमस्कार, युद्धप्रसंग योगासने, समूहगीते गायन झाले. सर्वात शेवटी मुलांना खाऊ वाटप करण्यात आला.

# ६) वार्षिक स्नेहसंमेलन



प्रत्येक विद्यार्थ्यांमधील सुप्तगुणांना संधी मिळणे आवश्यक असते विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्य विकसित करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकडून विविध कलाविष्कार सादर केले जातात या हेतूने विद्यालयांमध्ये विविध गुणदर्शनचा कार्यक्रम वार्षिक स्नेहसंमेलन दि .१३/१२/२०२४ रोजी आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाची.वेळ - दुपारी १ ते सायं ५ अशी असते.

प्रथम प्रमुख पाहुण्यांचे हस्ते स्टेज उद्घाटन दीप प्रज्वलन करण्यात आले. भव्य स्टेज, उपस्थित प्रेक्षक वर्ग, झगमगाट करणारी रोषणाई अशा वातावरणामध्ये गजवंदनाने कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमांमध्ये भक्ती गीत, देशभक्तीपर गीत ,कोळी गीत, आजी आजोबा थीम , बालगीते, नाटिका, शेतकरी गीत, असे विविध कलाविष्कार सादर करण्यात आले .

# ७) नवागत स्वागत



मंगळवार दि.18 जून 2024 रोजी आपल्या विद्यालयात नवागत विद्यार्थी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला सकाळी ठीक साडेदहा वाजता नावागत स्वागत समारंभाला सुरुवात झाली माननीय मुख्याध्यापक श्री शिंदे सर यांच्या हस्ते नवागताचे स्वागत करण्यात आले आनंददायी शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची छोटा भीम, डोरेमॉन, जोकर इत्यादी कार्टूनच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले व विद्यार्थ्यांना शालेय वस्तू भेट स्वरूपात देण्यात आल्या.

दुपारनंतर विद्यार्थ्यांसाठी छोट्याशा फनी गेम्स, बालगीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला व त्यानंतर त्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. अशा प्रकारे मोठ्या उत्साहात नवागतांचा स्वागत समारंभ संपन्न झाला.

## ८) परिसर निरीक्षण सहल व क्षेत्रभेट



इयत्ता चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांची परिसर निरीक्षण सहल व क्षेत्रभेट उपक्रमांतर्गत भोसगाव, फुलपाखरू उद्यान व मराठवाडी धरण तसेच मानेचीवाडी पहिले सौर गाव या ठिकाणी नेण्यात आली. सकाळी ठीक साडेआठ वाजता वाहनांच्या मदतीने विद्यार्थ्यांना मराठवाडी धरण या ठिकाणी नेण्यात आले. विद्यार्थ्यांनी धरण परिसर निरीक्षण.केले ठीक अकरा वाजता भोसगाव येथील फुलपाखरू उद्यानात नेण्यात आले. तेथील फुलपाखरांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली

दुपारी एक वाजता मानेचीवाडी महाराष्ट्रातील पहिले सौरगाव पंतप्रधान सूर्य घर .
%100 योजनेअंतर्गतवीज बिल मुक्त गाव तसेच माझी वसुंधरा पुरस्कार प्राप्त असलेल्या
गावाची विद्यार्थ्यांनी पाहणी केली तेथील सरपंचांनी गावातील योजनेबद्दल माहिती सांगितली .
फुलपाखरू उद्यानात विद्यार्थ्यांनी जेवणाचा आस्वाद घेतला त्यानंतर
परतीचा प्रवास सुरु झाला.

# ९) स्वयंशासन दिन



डॉक्टर राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करतात. विद्यार्थी -शिक्षक . यांच्यातील नाते दृढ होण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा मानला जातो.

सदर दिवशी राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या जीवन कार्याची माहिती सांगितली. श्री मळाईदेवी नागरी पतसंस्थेच्या वतीने शिक्षकांना भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. .

तसेच सदर दिवशी आपल्या विद्यालयातील पाचवी ते आठवी चे विद्यार्थी इतर वर्गांना अध्यापन करतात.

# १०) श्री मळाईदेवी शिक्षण संस्था वर्धापन दिन




**संस्था उभारणीसाठी मोलाचे कार्य करणारे ब्रह्मीभूत गंगाधर वासुदेव चैतन्य महाराज यांच्या विषयी माहिती सांगण्यात येते. सकाळी परिपाठानंतर श्री मळाईदेवी व चैतन्य महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येते. संस्थेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांचा विविध कला गुणदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. अशा प्रकारे मोठ्या उत्साहात श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन साजरा करण्यात येतो.**

# अभिरूप निवडणूक




**आपल्या विद्यालयात मतदान प्रक्रिया कशा प्रकारे होते त्याची प्रत्यक्ष माहिती होण्यासाठी अभिरूप निवडणूक या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये अर्ज भरणे, सभा घेणे, प्रचार करणे या प्रकारे विद्यार्थ्यांनी गुप्त मतदान पद्धतीचा अनुभव घेतला. त्यामध्ये दोन पॅनलही करण्यात आले होते. त्यानुसार विजयी गटाचा सत्कार करण्यात आला. त्यांना कामाची पद्धतही समजावून दिली याद्वारे विद्यार्थ्यांना सामाजिक व राजकीय घटकांची माहिती दिली.**

# १२) रात्रशाळा



सर्व विध्यार्थ्यांना रात्रीचे अवकाश निरीक्षण करता यावे अवकाशातील विवध गोष्टींचे ज्ञान . विध्यार्थ्यांना मिळावे म्हणून कोल्हापूरचे अवकाश निरीक्षक व भूगोल विषयाचे तज्ञ मा श्री. गवळी सर यांना मार्गदर्शनासाठी बोलविण्यात आले होते. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना खूप छान पद्धतीने अवकाशातील गोष्टी समजावून सांगितल्या. पालकांनी या उपक्रमाचे खूप कौतुक केले.

# शिष्यवृत्ती विभाग - गुरुकुल पॅटर्न




## श्री मळाईदेवी शिष्यवृत्ती परीक्षा-:

स्पर्धा परीक्षांचा जास्तीत जास्त अभ्यास व्हावा म्हणून आपल्या विद्‍यालयात गुरुकुल पॅटर्न राबवला जातो. इयत्ता पहिली पासून मंथन, स्पीड मॅथ्स , श्री मळाईदेवी शिष्यवृत्ती परीक्षा अशा विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते.

इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्‍यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते. या शिष्यवृत्ती वर्गाची अधिक तयारी व्हावी म्हणून इयत्ता चौथी व सातवीच्या वर्गासाठी संस्थांतर्गत श्री मळाईदेवी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते.

या उपक्रमांतर्गत जवळजवळ शंभर सराव पेपर विद्‍यार्थ्यांकडून सोडवून घेतले जातात. संस्थेने सुरू केलेल्या मळाई शिष्यवृत्ती परीक्षेमुळे पाचवी आठवी शासकीय शिष्यवृत्तीला बसणाऱ्या विद्‍यार्थ्यांचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढतो आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती धारक होण्याचे विद्‍यार्थी प्रमाणही शाळेचे वाढलेले आहे.

# सहल विभाग-




विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच पुस्तकाबाहेरील जगाची ओळख व्हावी, तसेच आपल्या परिसरातील हवामान, पिके, क्षेत्रफळ, लोकजीवन यांची ओळख व्हावी, म्हणून आपल्या विद्यालयात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दोन , सहलीचे आयोजन करण्यात आले यामधील . पहिली सहल ही इयत्ता पाचवी ते आठवी या विद्यार्थ्यांसाठी मुक्कामी सहलीचे आयोजन केले होते. सदर सहल ही अजंठा, वेरूळ लेणी, खुलताबाद, छत्रपती संभाजी नगर ,शिर्डी, मोरगाव घृष्णेश्वर या ठिकाणी गेली .

तदनंतर दुसरी सहल ही इयत्ता पहिली ते चौथी या विद्यार्थ्यांसाठी कोकण दर्शन सहलीचे आयोजन केले. गणपतीपुळे, नाणीज, थिबा पॅलेस, रत्नागिरी या ठिकाणी एक दिवसीय जाऊन आली.

बालवाडी ची सहल मराठवाडी धरण, फुलपाखरू उद्यान व श्री जकुआई भवानी माता मंदिर आंब्रुळकरवाडी या ठिकाणी गेली.

# आपल्या विद्यालयाच्या विविध उपक्रमांच्या अधिक माहितीसाठी आपल्या

# आदर्श आगाशिवनगर

**you tube चैनल ला अवश्य भेट द्या**